International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# विजय जावळे यांच्या साहित्यातील ग्रामसंस्कृती आणि मूल्यविचार

**संजय कारभारी सोनवणे**
*Ph. D. संशोधक मराठी विभाग*
*वसंतदादा पाटील महाविद्यालय पाटोदा ता पाटोदा जि बीड*
***Corresponding Author –*** ***संजय कारभारी सोनवणे***
**DOI - 10.5281/zenodo.17657109**

'खेड्यातील जीवनशैली, परंपरा, आणि त्यातून निर्माण होणारे नैतिक विचार. ग्रामीण संस्कृतीत, निसर्गावर आधारित जीवनशैली, एकत्र कुटुंब पद्धती, आणि पारंपरिक चालीरीतींना महत्त्व दिले जाते. यातूनच समता, न्याय, आणि सामाजिक बांधिलकीचे विचार रुजतात.ग्रामीण महाराष्ट्रातील परिवर्तनांचा मागोवा... १९६० पासून ग्रामीण साहित्याचा जो प्रवाह मराठी साहित्याचा जो पगडा आहे त्यात साहित्यिक विजय जावळे हे नाव प्रामुख्याने येते . ग्रामीण जीवनाचं वास्तव दर्शन त्यांनी आपल्या 'रितं गाव,खांदेमळणी आणि इतर कादंबऱ्यांतून तसेच थांतून घडवले. विशेष म्हणजे ग्रामीण साहित्याची संकल्पना मांडून, परंपरा दाखवून, समिक्षेसाठी उपयुक्त असे निकषही त्यांनी रुजवले, त्यांच्या ललित लेखनातून आणि समिक्षेतून त्यांची ग्रामजीवनाबद्दलची ओढ, ग्रामीण संस्कृतीत होणाऱ्या विघटनाबद्दलची खंत सातत्याने दिसते. 'ग्रामसंस्कृती'त होत गेलेली स्थित्यंतरे वाचकांसमोर मांडतात. सर्वसामान्य वाचकवर्ग डोळ्यांसमोर असल्यानेच बहुधा सोप्या, सुटसुटीत भाषेत ग्रामीण संस्कृतीची निर्मिती कशी झाली येथपासून ते आज ग्रामीण संस्कृतीचा ऱ्हास का होतो आहे येथपर्यंतचा मागोवा विजय जावळे यांनी घेतला आहे. प्रकृती, विकृती आणि संस्कृती या शब्दांतील नाते स्पष्ट करीत संस्कृती हा मानवी मूळ स्वभावाचाच एक भाग कसा आहे हे विजय जावळे स्पष्ट करतात. संस्कृती चांगल्या कृतींची आणि गतिमान असते. स्वास्थ्य मिळाल्यावरच माणूस संस्कृती निर्माण करु शकतो हे पहिल्या लेखातून स्पष्ट होते.

'ऊसतोड मजुरांचे जगणे मांडणाऱ्या अनेक साहित्यकृती मराठीत आहेत. त्यातल्या काही आपल्या अंगभूत सामर्थ्याने उठून दिसतात. सरदार जाधव यांची या विषयावरील 'कोयता' ही अप्रतिम कादंबरी आहे. या कादंबरीला १९७२च्या दुष्काळानंतरची पार्श्वभूमी आहे. दुष्काळाआधीची सुबत्ता, त्यानंतर दुष्काळामुळे मोडून पडलेला गावगाडा असे चित्रण या कादंबरीत आहे. दुष्काळानंतर एक-दोन वर्षांनी चांगला पाऊस पडतो. तोवर शेतीधंद्यातही बदल झालेले असतात. आधीचे परंपरागत बियाणे नष्ट होऊन नवनवी बियाणी आलेली असतात. शेती खर्चिक होते. पारंपरिक शेती करणारे कुटुंब शेवटी कामधंद्यासाठी गाव सोडते. ऊसतोडणीचा कोणताही अनुभव नसलेल्या या कुटुंबाला ऊसतोड मजूर म्हणून राबावे लागते. सुरुवातीला ऊसतोड मजूर, नंतर मुकादम आणि त्यानंतर ऊस उत्पादक शेतकरी असे टप्पे या कुटुंबाच्या

आयुष्यात येतात. ऊसतोड कामगार, मुकादम आणि ऊस उत्पादक शेतकरी अशा तिन्ही घटकांना या कादंबरीत स्पर्श करण्यात आला आहे. मुख्य म्हणजे या तीनही अवस्था अनुभवणारे एकच कुटुंब आहे. सलग तीन वर्षातले हे तीन टप्पे या कुटुंबाने अनुभवले आहेत. तिन्ही टप्प्यावर या कुटुंबाच्या पदरी निराशाच आलेली आहे. या कुटुंबावरचा आघात केवळ नैसर्गिक नाही, त्याची बरीचशी कारणे व्यवस्थेत आहेत. ‘कोयता’मधून जे तपशील येतात, ते व्यवस्थेतल्या बदलाची नोंद घेणारे आहेत. ‘विजय जावळे यांची ‘लेकमात’ ही कादंबरी अलीकडेच प्रकाशित झाली आहे. यापूर्वी जावळे यांची ‘मिरगीपेर’, ‘चारखणी’, ‘रितं गाव’, ‘खांदेमळणी’ ही पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. ‘कोयता’प्रमाणेच मोजक्या शब्दांमध्ये वातावरण उभे करण्याचे ‘लेकमात’चे सामर्थ्य अजोड आहे.

सातत्याने अवर्षणाची झळ, त्यात केवळ पावसाळ्यातच हिरवे दिसणारे डोंगर आणि एरवी कायम जाणवणारी रखरख... हे बालाघाटच्या डोंगररांगांमधल्या अनेक गावांचे चित्र. ऊसतोडणीच्या दिवसांत या भागातली गावेच्या गावे रिकामी होतात. लाखो मजूर महाराष्ट्रभर कुठे कुठे आणि महाराष्ट्राच्याही बाहेर ऊसतोडणीसाठी जातात. गावाबाहेर पडताना या कुटुंबांची अनेक स्वप्ने असतात. लेकीबाळींची लग्ने, स्वत:च्या जमिनीचा तुकडा पाण्याखाली आणण्यासाठी काही साधनं निर्माण करण्याची धडपड, कुटुंबातल्या शाळकरी मुलांच्या भविष्यावर होणारा परिणाम… हे मजूर गाव सोडतात, तेव्हा त्यांच्यामागे गावात राहिलेल्या वयोवृद्धांची होणारी आबाळ, ऊसतोड मजुरांना परमुलखात गेल्यानंतरचे येणारे विविध अनुभव, कोयत्याला घेतलेली उचल फिटते की नाही याची चिंता, हंगाम सरताना गावी परतण्याची ओढ, अशा सततच्या संघर्षमय जीवनाचे चित्रण ‘लेकमात’मध्ये आलेले आहे.‘लेकमात’ या शब्दाचा अर्थ लग्नाची मुलगी असा होतो. मुलीच्या लग्नासाठी पै-पै जमवताना कुटुंबाची होणारी दमछाक, साऱ्या घरादाराला करावा लागणारा जीवतोड संघर्ष ‘लेकमात’च्या पानोपानी आहे. दोन सख्ख्या भावांचे एक संयुक्त कुटुंब कादंबरीत आहे. . विजय जावळे हे मराठवाड्यातील एक महत्त्वाचे लेखक आहेत, ज्यांना ग्रामीण भागातील जीवनाचे आणि समस्यांचे उत्कृष्ट ज्ञान आहे. त्यांची लेखनशैली वास्तववादी आणि प्रभावी आहे, जी वाचकांना आकर्षित करते. 'चारखणी' या कादंबरीत त्यांनी दुष्काळ आणि त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकला आहे.